

# महिला सहाय कक्ष : तक्रारीचे स्वरूप

**प्रत्येक पोलीस स्टेशन तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय येथे महिलांच्या तक्रारी सोडविण्यासाठी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.**

- विवाहित स्त्रियांचा हुंड्यासाठी सासरच्या मंडळीकडून शारीरिक, मानसिक छळ होत असेल तर ती तक्रार करू शकते.
- पती–पत्नीमध्ये कोणत्याही कारणावरून बेबनाव होत असल्यास ते दोघे तक्रार करू शकतात.
- पहिली पत्नी जिवंत असताना पती दुसरे लग्न करण्याच्या तयारीत असेल तर पत्नी अर्ज करू शकते.
- पतीने पत्नीला कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा परवानगी न घेता दुसरे लग्न केले असल्यास पत्नी अर्ज करू शकते.
- मुलींनाच जन्म दिल्यामुळे म्हणजे मुलगा नसल्यामुळे पत्नीचा छळ होत असल्यास पत्नी तक्रार करू शकते.
- नोकरी करणाऱ्या पत्नीस तिने पूर्ण वेतन घरात द्यावे म्हणून सासरच्या मंडळीकडून त्रास होत असल्यास ती तक्रार करू शकते.
- शाळा–कॉलेजात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेण्याचा प्रयत्न झाल्यास तक्रार करता येते.
- तरुण मुलीस विवाहाचे आमिष दाखवून तिची फसवणूक केल्यास तिला तक्रार करता येते.
- तरुण मुलीची प्रेमात फसवणूक झाल्यास तिला तक्रार करता येते.
- विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता अशा स्त्रियांवर सासरच्या मंडळीकडून कोणत्या प्रकारचा अत्याचार होत असल्यास ती तक्रार करू शकते.
- नियोजित वराकडून ठरलेले लग्न मोडले जात असल्यास ती मुलगी तक्रार करू शकते.

- पतीच्या किंवा पत्नीच्या विवाहबाह्य संबंधांमुळे त्यांच्यात तणाव निर्माण होऊन त्यांचे कुटुंब विस्कळीत होत असल्यास तक्रार करता येईल.
- विवाहित स्त्रीला सासरची मंडळी आणि नवरादेखील नांदविण्यास तयार नसल्यास किंवा स्त्रीची तेथेच नांदण्याची इच्छा असल्यास ती तक्रार करू शकते.



- पतीकडून, पालनपोषणासाठी आर्थिक मदत हवी असल्यास पत्नी अर्ज करू शकते.
- शाळा-महाविद्यालये, वसतिगृहे, शिकवणी वर्ग किंवा सार्वजनिक ठिकाणी रॅगिंग होत असल्यास मुली तक्रार करू शकतात.
- जबरदस्तीने विवाहाकरिता किंवा प्रेम करण्यासाठी भाग पाडले जात असेल तर ती तक्रार करू शकते.
- आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केल्यामुळे मुलीस सासरच्या किंवा माहेरच्या मंडळीकडून त्रास होत असेल तर ती तक्रार करू शकते.
- वयोवृद्ध महिलांना घरात स्वत:च्या मुलाकडून, सुनेकडून त्रास होत असेल तर ती तक्रार करू शकते.
- निराश्रित, निराधार, महिलांना राहण्याची सोय नसेल तर त्या अर्ज करू शकतात.
- आर्थिक व्यवहारात एखाद्या महिलेची फसवणूक झाल्यास ती तक्रार करू शकते.

उपरोक्त विषयानुसार किंवा आणखी अशी कोणतीही परिस्थिती असेल जिथे महिलांचे शोषण कोणत्याही मार्गाने होत असेल तर त्या महिला साहाय्य कक्षात थेट तक्रार करू शकतात.

## तक्रार अर्ज आल्यानंतर कामकाजाची पद्धत

**१) अर्जदार महिलेस माहिती देणे –** सर्वप्रथम महिला साहाय्य कक्षात येण्याऱ्या पीडित महिलांच्या तक्रारी तोंडी स्वरूपात ऐकून घेतल्या जातात. अर्जदार महिलेसोबत तिचे नातेवाईक असल्यास त्यांच्याकडूनही संबंधित प्रकरणाबाबत आर्थिक माहिती घेतली जाते. महिलेया तक्रारीचे स्वरूप आणि तिला पोलीस विभागाकडून काय मदत अपेक्षित आहे. यावरून अर्ज कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले जाते. बहुतांश वेळेला अर्जदार महिला अर्ज स्वत:च तयार करून आणतात. बऱ्याच वेळेस पीडित महिलेला पोलीस विभागाकडून काय मदत मिळू शकेल याचीच जाणीव नसल्यामुळे अशा महिलांना कोणकोणत्या स्वरूपाचे सहकार्य मिळू शकते याची थोडक्यात माहिती घेण्यात येते.



**२)अर्ज नोंदणी :–** अर्जदार व गैरअर्जदारांचे मोबाईल नंतर सविस्त पत्ता लिहून घेतला जातो. आलेल्या अर्जांची महिला साहाय्य कक्षाच्या स्टेशन डायरीत नोंद करून तो अर्ज रजिस्टरवर नोंदविला जातो. कर्मचाऱ्यांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार दररोज अर्जांचे वाटप केले जाते. पुढील कारवाई संबंधित कर्मचाऱ्याने करावयाची असते.

अर्ज नोंदणी करताना महिला अर्जदाराचे अर्ज थेट स्विकारले जातात. पण पुरुष अर्जदारांचे अर्ज महिला साहाय्य कक्षात स्विकारले जात नाहीत. त्यासाठी पुरुष अर्जदारांना मा.पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांच्याकडे अर्ज द्यावा लागतो. तो अर्ज नंतर कार्यालयीन टपालाअंतर्गत महिला साहाय्य कक्षात पुढील कारवाईस्तव प्राप्त होतो. काही वेळेस महिला अर्जदार स्वत: कार्यालयात न येता पोस्टानेदेखील अर्ज पाठवतात. अशा अर्जांचीही नेहमीच्या पद्धतीनुसार चौकशी व पुढील कारवाई केली जाते. परंतु अर्जदार महिलेने स्वत:चे पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, आपला किंवा

आपल्या नातेवाईकांचा टेलिफोन/मोबाईल नंबर, स्वत:ची स्वाक्षरी इत्यादी संपूर्ण माहिती लिहिलेली असावी जेणे करून तिला तात्काळ मदत उपलब्ध करून देता येईल.

**३) गैरअर्जदारांना चौकशीसाठी बोलावणे :-** अर्जदार महिलेने दिलेल्या अर्जामध्ये ज्या ज्या गैरअर्जदारांची नावे दिली असतील त्या सर्वांना सर्वप्रथम महिला साहाय्य कक्षाच्या टेलिफोनवरुन संपर्क साधला जातो. त्यांच्याविषयी दिलेल्या अर्जाची माहिती देऊन त्यांना महिला साहाय्य कक्षात पुढील चौकशीसाठी बोलावले जाते. एखाद्या वेळी गैर अर्जदाराचे मोबाईल नंबर उपलब्ध नसतील तेव्हा गैरअर्जदारांच्या दिलेल्या पत्त्यावरच्या माहितीनुसार संबंधित पोलीस ठाण्याला वायरलेस मेसेज पाठवला जातो. गैरअर्जदराला कक्षात हजर करण्यासंबंधी कधी कधी त्या



गावातील तंटामुक्ती अध्यक्ष किंवा सरपंच यापैकी ज्यांचा मोबाईल नंबर उपलब्ध असेल त्यांनाही गैरअर्जदारांना कक्षात हजर राहण्याची समज देण्यात यावी असे सूचित करण्यात येते.

**४) गैरअर्जदारांचे जबाब नोंदविणे:-** महिला साहाय्य कक्षातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या वायरलेस मेसेज किंवा दूरध्वनीवरील माहितीवरून गैरअर्जदार मंडळी दिलेल्या तारखेच व वेळेस हजर राहणे गरजेचे असते. महिला सहाय्य कक्षात येऊन स्वत:चे म्हणणे मांडण्याची त्यांना सक्ती असते जेणेकरून अर्जावरील तक्रारीनुसार त्यांची बाजू त्यांना मांडता येते.

गैरअर्जदार मंडळी प्रथम हजर होतात. तेव्हा त्यांना अर्जातील मजकूर सांगून त्यावरील प्रश्नानुसार त्यांचे जबाब लेखी स्वरुपात नोंदविले जातात. त्यांच्या जबाबाला पूरक अशा दस्ताऐवजांना उदा. वैद्यकीय प्रमाणपत्र, कोर्टाची कागदपत्रे, पोलीस तपासणीची कागदपत्रे इ. स्वीकारून ते जबाबास जोडून ते अर्जासोबत जोडले जातात.

**५) अर्जदार-गैरअर्जदारांच्या एकत्रित बैठका -** जबाब नोंदविल्यानंतर अर्जदार व गैरअर्जदारांना एकत्रित बोलावले जाते. दोघांच्या नातेवाईकांनाही बोलावले जाते. सर्वप्रथम अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेऊन अर्जदाराला त्यानुसार उत्तरे विचारली जातात. बहुतांश वेळेला ही चर्चा दोघासमोर असताना परंतु नातेवाईकांना बाजूला ठेवले जाते. काही वेळेस अर्जदार महिलेस काही विशिष्ट माहिती एकांतात सांगावयाची असल्यास तिच्या पतीस बाहेर थांबवून तिचे म्हणणे ऐकण्यात येते. नंतर नातेवाईकांनादेखील त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते.

पहिल्या बैठकीत अशा तऱ्हेने सर्वांचे म्हणणे सर्वांच्या समोरासमोर ऐकून त्यावर समुपदेशन केले जाते. काही साध्या-सरळ प्रकरणांत एकाच वेळी केलेल्या समुपदेशाने तात्काळ प्रभावीत होऊन अर्जदार, गैरअर्जदार हे दोघेही एकमेकांतील वाद संपवून तडजोड करून घेतात.

बऱ्याच वेळेस एकाच बैठकीत दोघांचेही गैरसमज दूर न झाल्यास दोघांना परत काही दिवसानंतर बोलावण्यात येते. त्यांना महिला साहाय्य कक्षातील कर्मचारी आणि कक्ष समिती तीन किंवा जास्त वेळेस बैठका घेण्यात येतात. गरज भासल्यास माननीय पोलीस अधीक्षक किंवा प्रभारी अधिकाऱ्याकडे संबंधितांना हजर केले जाते. तेथे वरिष्ठांमार्फत त्यांचे म्हणणे ऐकूण घेऊन त्यांचे समुपदेशन केले जाते.

**६) महिला साहाय्य कक्ष समितीच्या बैठकीस बोलावणे -** वारंवार समुपदेशन करूनही काही प्रकरणांमध्ये मार्ग निघत नाही. मग अर्जदार व गैरअर्जदांना महिला साहाय्य कक्ष समितीच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी होणाऱ्या बैठकीत बोलावले जाते. महिला साहाय्य कक्ष समितीमध्ये डॉक्टर्स, वकील,पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक इत्यादी मंडळी असतात. त्यांच्यासमोर संबंधितांना हजर करून समुपदेशन केले जाते. अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते मार्गदर्शन करून त्यामध्ये मार्ग सुचविला जातो, अशा पद्धतीने तडजोड किंवा इतर काही मार्ग निघाल्यास अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे नातेवाईक यांच्या सह्या महिला साहाय्य कक्षाच्या तडजोड रजिस्टरवर घेतल्या जातात.

## निर्णयांचे स्वरूप

**१) तडजोड Compromise** – अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वारंवार चर्चा घडवून आणून त्यांना समुपदेशित केले जाते. एकमेकांतील लहान–मोठे गैरसमज मिटविण्यासाठी महिला साहाय्य कक्षातील कर्मचारी, समिती सदस्य तसेच वेळप्रसंगी अधिकाऱ्यांमार्फत समुपदेशन केले जाते. समपदेशानंतर दोघांनाही स्वतंत्रपणे चर्चा करण्यास वेळ दिला जातो. त्यांच्यातील परस्पर चर्चेनंतर अर्जदार व गैरअर्जदार यांच्या परस्पर संमतीने त्यांच्यात तडजोड घडवून आणली जाते. बहुतेक प्रकरणे ही वैवाहिक आयुष्यात गैरसमजांमुळे निर्माण झालेली असतात. अशा वेळी त्यांच्यातील लहान–मोठे गैरसमज काढून टाकण्यासाठी मोकळी चर्चा घडवून आणली जाते. त्यामुळे परस्परांत असलेल्या थोड्या फार



उणीवांसाठी एकमेकांना स्वीकारून एकमेकांसोबत नांदण्याची तयारी असलेल्या जोडप्यांमध्ये तडजोड घडवली जाते. परस्परांमध्ये जुन्या असलेल्या सकारात्मक बदलांना सुचविण्यात येते. त्यानुसार, स्वत:मध्ये बदल घडवून आणण्याची तयारी अर्जदार व गैरअर्जदार दाखवतात. अशा प्रकारे दोन्ही पक्षांच्या स्वखुशी व सहमतीने त्यांना नांदण्यास पाठविण्यात येते.

तडजोड होऊन नांदायला गेलेल्या जोडप्यांना ठराविक दिवसानंतर पुन:पडताळणी (Follow up) साठी महिला साहाय्य कक्षात बोलावण्यात येते. पुन्हा भेटायला येणाऱ्या जोडप्यांना त्यांचा संसार व्यवस्थित चालू आहे का याविषयी दोघांकडेही स्वतंत्रपणे चौकशी करून खातरजमा केली जाते. पडताळणी रजिस्टरवर दोघांच्याही स्वाक्षऱ्या घेण्यात येऊन परत पुढची तारीख देण्यात येते. वारंवार त्यांचे Follow up घेण्यात येतात. जेव्हा अर्जदार स्वत: होऊन विनंती करतात की, **आता आमचे अगदी सुरळीत चालू असून पुढची तारीख देऊ नये** तेव्हाच पुन:पडताळणीसाठी त्यांना बोलावणे थांबविले जाते.

पुन:पडताळणीसाठी आल्यावर दोघांकडूनही पूर्वी ठरविल्याप्रमाणे वर्तन होत नसेल तर तो चुकत असेल त्यास कडक शब्दांत समज देण्यात येते. गैर अर्जदारामध्ये सुधारणा होत नसेल तर अर्जदार बाईच्या लेखी विनंतीनुसार कायदेशीर कारवाई पत्र देण्यात येते. किंवा कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंध कायदा २००५ अन्वये संरक्षण अधिकाऱ्यांच्या नावे पत्र देण्यात येते.

२) **कायदेशीर कारवाईचे पत्र देणे:-** एखाद्या अर्जदार बाईस जीवे मारण्याचा प्रयत्न सासरच्या मंडळीकडून झाला असल्यास किंवा आत्यंतिक शारीरिक-मानसिक छळ सोसावा लागला असेल आणि गैरअर्जदारांवर थेट कायदेशीर कारवाई करावयाची असल्यास तिला कायदेशीर कारवाई करण्याबाबतचे पत्र संबंधित पोलीस ठाण्याच्या नावे देण्यात येते. परंतु तत्पूर्वी अर्जदार बाईच्या अर्जावरून सर्व गैरअर्जदारांना महिला साहाय्य कक्षात बोलावून त्यांचे लेखी जबाब नोंदविले जातात. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात समोरासमोर चर्चा झाल्यास तिचा लेखी अर्ज व लेखी जबाब घेऊन वरिष्ठांकडे त्यांना हजर केले जाते. वरिष्ठांकडून सर्व प्रकरणाची शहानिशा झाल्यावर अर्जदार बाईस कायदेशीर कारवाईस मदत करण्याचे पत्र महिला सहाय्य कक्षातून दिले जाते. अर्जदार बाईच्या अर्जानुसार संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होतो.

३) **संरक्षण अधिकाऱ्याकडे प्रकरण वर्ग करणे:-** महिला साहाय्य कक्षाकडे येणाऱ्या तक्रारदार महिला व त्यांचे पती यांच्यामध्ये प्रत्येक वेळेस तडजोडच होते असे नाही. बऱ्याच वेळा, नवरा त्या बाईस नांदविण्यास तयार होत नाही. आणि अर्जदार बाई ही त्याच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल न करता नांदायला जाण्यावर भर देतात. तिला नवऱ्याच्या घरात जाऊन राहायचे असते. काही वेळा तिला नवऱ्याकडून आर्थिक मदतीची अपेक्षा असते. अशा वेळी महिला साहाय्य कक्षाकडून मा. संरक्षण अधिकारी त्यांच्या नावे महिलेस कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ यातील तरतुदीनुसार मदत करण्या बद्दल पत्र देण्यात येते.

४) **स्वतंत्र निर्णय:-** काही जोडप्यांमध्ये एकमेकांसोबत नांदण्याची इच्छा नसते. त्यामुळे ते एकमेकांपासून घटस्फोट घेऊ इच्छितात. काही वेळेस

पती-पत्नीमधील वाद प्रॉपर्टीशी संबंधित असेल तर अशा वेळी संबंधितांना स्वतंत्र निर्णय घेण्यात येतो. स्वतंत्र निर्णय याचा अर्थ असा होतो की, महिला साहाय्य कक्षात त्यांनी दिलेल्या अर्जावर त्यांच्या मनासारखे समाधानकारक उत्तर मिळू न शकल्याने त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यात येते. व पुढील निर्णय ते स्वतंत्रपणे घेऊ शकतात. म्हणजेच त्यांचा वाद ते न्यायालयामार्फत, आपसांत, नातेवाईकांमार्फत इत्यादी कोणत्याही प्रकारे मिटवू शकतात.

**५) प्रकरण फाईल करणे:-** बऱ्याचदा वायरलेस मेसेज करूनही अर्जदार, गैरअर्जदार हे महिला साहाय्य कक्षात हजर होत नाहीत. किंवा काही वेळेस त्यांच्यातील वाद ते आपसांत, नातेवाईकांच्या मदतीने मिटवून घेतात किंवा अर्जदार हा कोणत्याही कारणावरून ते आपला अर्ज परत घेऊ इच्छित असेल तर अशा कोणत्याही परिस्थितीत सदर अर्ज समिती सदस्य आणि वरिष्ठांमार्फत फाईल करण्यात येतो.

## निर्णय कोणामार्फत घेण्यात येतो?

**१) समितीमार्फत निर्णय :-** महिला साहाय्य कक्षात स्वतंत्र तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. या समितीमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक, वरिष्ठ पोलीस अधिकारी, महिला सहाय्य कक्षाचे प्रभारी अधिकारी, डॉक्टर्स, वकील, पत्रकार, प्राध्यपक, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर मंडळी असतात. त्यांच्या वतीने अर्जांची सखोल चौकशी, अर्जदार व गैरअर्जदार यांच्याशी चर्चा समुपदेशन इत्यादी केले जाते. या समितीची बैठक दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी होत असते. बैठकीमध्ये प्रकरणे ठेवण्यात येतात. त्यावर प्रत्यक्ष चर्चा व समुपदेशन होऊन समितीमार्फत संबंधित प्रकरणामध्ये निर्णय दिला जातो.

**२) पोलीस अधीक्षक/प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत निर्णय :-** समितीच्या बैठकीचे दिवस वगळता आलेली प्रकरणे मा.पोलीस अधीक्षकांकडे किंवा प्रभारी अधिकाऱ्यांकडे नेली जातात. अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्यातील वाद मिटविण्यासाठी वरिष्ठांकडून चर्चा/ समुपदेशन केले जाते. अशा प्रकारेही अनेक प्रकरणे सोडविण्यास येतात.